ISSN 2278-8808
SJIF 2015: 5.403
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# पेपर – शिक्षक प्रशिक्षणात संगीत विषयाचे स्थान,महत्त्व व उपयोग

**प्रा. डॉ. शर्मिला भाऊसाहेब पारधे** *(Page 306-310)*
*विद्या प्रतिष्ठान (महाराष्ट्र)संचलित,*
*शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अहमदनगर.*

**SRJIS IMPACT FACTOR SJIF 2015**: 5.401
**Date of Issue Release:** 04/03/2017,
**Volume**: SRJIS, Jan-Feb, 2017, 4/30

***ABSTRACT***

*मानवी मनातील विविध भावभावनांचे प्रकटीकरण त्याला जाणवणाऱ्या सौंदर्यानुभूतिचे माध्यम म्हणजे कला. या विविध प्रकारच्या आहेत. प्रत्येक व्यक्तिच्या अंतर्गत भावभावनांना अभिव्यक्त करण्याची क्षमता असते, परंतु ती जर कलारुप असेल तर खऱ्या अर्थाने भावनेचा अविष्कार पहायला मिळतो. यासाठी जीवनामध्ये संगीत शिक्षणाचा आस्वाद घेऊन त्यातून विकासाच्या दिशेने योग्य रीतीने वाटचाल करण्याचा आनंद मिळेल संगीत शिक्षणातून मानसिक शारीरिक व बौद्धिक विकास साधता येईल. सामाजिक व बांधीलकीचा विचार प्रत्येकाच्या मनात रुजविणे आवश्यक आहे. कलेच्या माध्यमातून जीवनातील महत्त्वाच्या मूल्यांचा प्रत्यक्षात जीवन आचरणासाठी उपयोग होऊ शकेल. गायन, वादन, नृत्य, नाट्य या व यांसारख्या ६४ कलांच्या उपक्रमांतून संगीतमय वातावरणाचा पुरेपूर आस्वाद घेऊन कल्पनाशक्ती व कल्पकतेला उत्तमप्रकारे वाव मिळू शकतो.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना

प्राचीन काळापासून मानवाचा विविध कलांशी संबंध आहे. या विविध कलांचा विकास मानवाच्या कर्तृत्वाची साक्ष देणारा आहे. प्राचीन काळापासून ६४ कलांचा उल्लेख आढळतो. आज आधुनिक काळात या कलांमध्ये वाढच झालेली दिसते. विविध कलाप्रकार जगाच्या पाठीवर अस्तित्वात आहेत त्यातच सरमिसळ करुन, त्यांच्यावर वेगवेगळे प्रयोग करुन कलाकारांनी नवनिर्मिती केलेली आढळते.

शिक्षकाला आपल्या प्राचीन संस्कृतीचा वारसा समजून घेणे आवश्यक आहे. आपल्या अभ्यासक्रमाचा गाभा घटकांपैकी एक प्रमुख घटक म्हणून त्याचा समावेश आहे. आज विज्ञानयुगात आपण राहत असलो तरी कलेपासून मानव दूर गेलेला नाही. उलट कलांना उजाळा देण्याचे नवनवीन रुप देण्याचे कार्य सुरु आहे. अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विविध कला–नाट्य यांद्वारे विविध विषयांचे प्रभावी अध्यापन शिक्षक करु शकतो. तसेच प्रत्येक विषयाच्या अध्यापनात नाट्याचा समावेश करुन विद्यार्थ्यांच्या क्रियाशीलतेला चालना देऊ शकतो.

मानवाच्या दैनंदिन जीवनात संगीताचा संबंध येत असतो. मानवी जीवन जेवढे व्यापक आहे तेवढेच संगीतचे क्षेत्रही व्यापक आहे. संगीत हे चराचरात व्याप्त असल्यामुळे दैनंदिन जीवनात संगीताचा संबंध येत आला आहे. संगीत हे केवळ मनोरंजनाचे स्थान नसून मानवाच्या कुठल्याही क्षेत्रातील विकासामध्ये संगीत हा अविभाज्य घटक आहे. आपण म्हणतो, मानवास जीवंत राहण्यासाठी

भोजन, वस्त्र व निवारा असे अनिवार्य तत्व आहेत पण त्याला संगीताला सुद्धा या प्रमुख गरजांमध्ये स्थान देणे आवश्यक आहे.

**१) विश्वातील लयबद्धता व संगीतमय निसर्ग –** संगीताचे माध्यम म्हणजे स्वर व लय. 'लय'याचा अर्थ गती. संगीतामध्ये समान गतीस 'लय' असे म्हणतात. संपूर्ण विश्वच संगीतमय आहे. सारे ब्रह्मांडच तालमय व संगीतमय आहे.

**२) मानसिक स्वास्थ्य आणि संगीत –** मानसशास्त्राच्या दृष्टिकोनातून पाहिले असता निःसंकोचपणे आपण म्हणू शकतो की, भावनांच्या अभिव्यक्तीसाठी सर्वाधिक सूक्ष्म व सशक्त साधन म्हणजे संगीत होय.

मानवाच्या रोमारोमामध्ये संगीत व्याप्त असल्याने संगीताच्या माध्यमांनी मानसिक व्याधी, असह्य असे शारीरिक रोग बरे केले जातात. स्वैर वागणाऱ्या मनुष्यावर संगीत ऐकवून त्याला सुबुद्ध व संयमी नागरिक बनविता आले हे सर्व प्रयोगांनी सिद्ध झाले आहे.

**३) संगीत म्हणजे स्फूर्ती व शक्ती –** दैनंदिन जीवनात मनुष्य हा सुख–दुःखाच्या प्रसंगी संगीताचा आश्रय घेतो. माणूस परिश्रम करतो व आपला थकवा घालविण्यासाठी संगीताचा आधार घेतो, खरे म्हणजे विविध लोकगीते, लग्नातील गाणी, मंगलदिनी गाणी व उत्सव प्रसंगी गायली जाणारी गीते व मोटकरी, गाडीवान हे सर्वजण आपला शीण घालविण्यासाठी दैनिक दिनचर्येत गीते गातात.

**४) लोकसंगीत व संस्कृती –** संस्कृतीचा सुखद संदेश देणारी कला म्हणजे लोकसंगीत. यासाठीच संगीत हे कुणालाही आवडते. कारण लोकसंगीतात सामाजिक व सांस्कृतिक मूल्ये प्रतिबिंबित झालेले दिसून येतात. माणासाच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत संगीताचा उपयोग होत गेला आहे. म्हणून दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक म्हणजे संगीत होय.

**२. कार्यवाही**

*** संगीत विषयाची शालेय अभ्यासक्रमात गरज –** शालेय शिक्षणामध्ये मुलांवर चांगले संस्कार, नीतिमूल्ये जोपासण्यासाठी संगीत अग्रेसर राहत आले आहे. देशभक्तिपर गीते , प्रार्थना, विविध सांस्कृतिक मुल्यांची विषय असणारी गीते व नृत्य मुलांना शिकविले जातात. त्यातून मुलांवर चांगले संस्कार घडविले जातात, ते शाळेतूनच होय.

शाळेतील प्रार्थना गीते, कवायत, राष्ट्रगीते विद्यार्थ्यांकडून म्हणवून घेतल्याने शाळेतील वातावरण आनंदित राहून इतर विषयाच्या अभ्यासासाठी मुलांना प्रेरणा मिळते. गद्यापेक्षा कविता कितीही मोठी असली तरीही चाल सोपी असल्यास अधिक सहजतेने त्यांना आत्मसात करता येते. त्यामुळे विद्यार्थ्यांची पाठांतर शक्ती व स्मरणशक्ती वाढते.

***संगीत विषयाचा अध्यापनातील उपयोग**

बालकांच्या भावना या प्रौढ व्यक्तीपेक्षा प्रखर असतात. त्यामुळे शाळेत मुलांना गीत, नृत्य, बडबडगीते इत्यादी रेडीओ व कॅसेटद्वारे शिकवणे क्रमप्राप्त ठरते. प्रत्येक मुलाचे आंतरिक जग वेगळे असते. अशा वेळी

त्यांच्या मनातील, अंतःकरणातील भावानदि गुणांचा विकास करण्यासाठी काय उपाय करावा लागेल याचा विचार आपण करणे आवश्यक ठरते.

संगीताच्या माध्यमाने मुलांना शालेय शिक्षण दिल्यास उच्च संस्कार, शिस्त या गोष्टी मुलांमध्ये सहजपणे रुजविण्यावर मदत होते. संगीत विषयामुळे मनाचे केंद्रीकरण होऊ शकते. उच्चारी आवाजावर नियंत्रण करण्यासाठी, निश्चित कंपन संख्येतून आवाज काढण्याच्या प्रक्रियेमधून मुलांमध्ये मनाचे केंद्रीकरण व निरीक्षण इत्यादी गुण वाढीस लागतात. गीते पाठ करुन गाण्यामुळे मुलांच्या स्मरणशक्तीची वाढ होते. विविध संगीत क्रियामुळे कल्पनाशक्ती व विविध गायन, वादन व नृत्य शैलीमुळे मुलांच्या विचारप्रक्रिया विकसित होतात. फुलांचे रंग, नक्षत्रांची नावे, ऋतू, पृथ्वी, चंद्र, सूर्य, आचार, व्यवहार हुतात्मे, संत, महात्मे, वैज्ञानिक खेळ, कवायत, पशु–पक्षी, वृक्ष अशा विषयांनी युक्त असलेल्या संगीतमय रेकॉर्डस् मुलांना ऐकविल्या गेल्या पाहिजेत. त्यामुळे मुलांची एकाग्रता वाढते. मुलांमध्ये हवे ते संस्कार टाकून चांगले चरित्र घडविण्यासाठी किंवा त्यांच्या चरित्र निर्मितीसाठी आई–वडिलांचे संस्कार निर्माण करण्यास सामर्थ्य आहे ते केवळ संगीतातच !

*** संगीत कलेचे व्यवसायातील महत्त्व –**

आधुनिक काळानुसार भारतीय संगीत क्षेत्रात लक्षणीय बदल झाले. संगणकीय, वेगवान युगात 'स्पर्धा' हा अविभाज्य घटक बनला. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे जग जवळ आले. धावपळीच्या आयुष्यात 'मनोरंजन' हा महत्त्वाचा घटक बनला. त्यासाठी विविध कलांचे शिक्षण देण्यासाठी अनेक संस्था कार्यक्रम आयोजित करु लागल्या, रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळत गेला. 'जीवनासाठी कला' असे बदलेले रुप रूढ होऊन कला व्यावसायिकतेने झुकली. त्यासाठी रेडिओ, टेपरेकॉर्डर, टेलिव्हिजन इत्यादी दृक्–श्राव्य माध्यमाद्वारे कलाकार –रसिकात देवाण घेवाणीची प्रक्रिया सुरु झाली. त्यातूनच आज आपण विविध मैफिली, सम्मेलने, रेडिओ/टी.व्ही. कार्यक्रम इत्यादी वारंवार आयोजित होत असल्याचे बघतो. म्युझिक सर्कल्स, तयार होऊन ते आराखडासकट, साचेबद्ध व्यावसायिक कार्यक्रम ठिकठिकाणी करतांना दिसतात. अनेक संस्था, कार्यकारिणीद्वारे अशा म्युझिक सर्कल्सशी संपर्क साधून कलाकारांची संख्या, कार्यक्रमाचे स्वरुप, राहण्या–खाण्याची , ने–आण करण्याची व्यवस्था, मानधन इत्यादी प्रकारची औपचारिक कामे करतात.

**स्वरभास्कर पं. भीमसेन जोशी**

पंडीत भीमसेन जोशी यांनी आपल्या किराणा घराण्याच्या गायकीत या तंत्रज्ञानाला असे काही सामावून घेतले की, ते तंत्रज्ञानही एका प्रतिभावान आणि समर्थ गायकीमुळे लोकप्रिय झाले.

ज्या काळात ध्वनिमुद्रणासाठी आवाज देणे हे 'पाप' समजले जात असे, त्या काळातील ध्वनिमुद्रणामुळे त्यांचे गाणे अजरामर होऊ लागले. पंडित भीमसेन जोशींच्या गायनाचे उत्तुंग प्रतिभेला धुमारेही त्या काळी फुटत होते. हे साऱ्या जगाचे नशीबच म्हटले पाहिजे.

रामचंद्र गणेश कुंदगोळकर उर्फ गंधर्वांचे शिष्य म्हणून पंडित भीमसेन जोशींनी आपल्या कारकिर्दीला खऱ्या अर्थाने बहर आणला.

पंडित भीमसेन जोशींच्या पत्नीचे नाव वत्सलाताई होते. त्यांच्या सहकार्याने पंडितजींनी आपले कार्य अव्याहतपणे सुरुच ठेवले. गायनाबरोबरच पंडितजींनी गेली ५३ वर्षे 'सवाई गंधर्व संगीत' महोत्सवाच्या निमित्ताने चांगले गाणे ऐकण्याची सवय लावणारा असा थोर गायक म्हणून प्रकाश झोतात आले.

पंडित भीमसेन जोशींच्या तीन ते पाच मिनिटांच्या इपी रेकॉर्डच्या जमान्यातील गाणे, त्यानंतर वीस मिनिटांच्या लाँग प्लेईंग रेकॉर्डच्या जमान्यातील त्यांचा गोळीबंद ख्याल, त्यानंतर नव्वद मिनिटांचे ध्वनिमुद्रण करता येऊ शकणारे कॅसेटचे तंत्रज्ञान या सगळ्या काळात पंडित भीमसेन जोशींनी या तंत्राला नामोहरम केले असे म्हटले तरी वावगे होणार नाही. अभिजात संगीताचे व्यापारीकरण सुरु झाले तेंव्हाही पंडितजींच्या स्वरांनी सारे जग उत्तुंग भरारी मारत होते. 'ख्यालिया' असे बिरुद समर्थपणे मिरवणाऱ्या पं. भीमसेन जोशींनी त्या ऐन उमेदीच्या आणि नंतरच्या परिपक्व काळात या साऱ्या तंत्राला अवगत केले. त्यामुळे जगात भारतीय अभिजात संगीतातील सर्वात जास्त ध्वनिमुद्रण कदाचित फक्त पंडितजींचेच असेल.

पं. भीमसेन जोशी यांचे तबल्याचे साथीदार चंद्रकांत कामत,नाना मुळे यांचे सहकार्य मिळाले. त्यांचे चिरंजीव आणि शिष्य 'श्रीनिवास ' हा वारसा निश्चितच चालवतील. उत्तम गायक असतांनाच शेकडो शिष्य निर्माण करणारे मनस्वी कलावंत व उत्तम संघटक म्हणून पंडितजींकडे भारतीय जनतेने बघितलेले आहे.

स्वरांच्या पहिल्या श्वासातच प्रेक्षकाला स्वरांच्या कवेत यायला उत्सुक बनविणारा राहतो, हेच पं. भीमसेन जोशींच्या गायकीचे वैशिष्ट्य होते व आहे. संगीत रसिकांच्या मनावर साम्राज्य करणारे हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतकार घनगंभीर गायकीने अढळ स्थान निर्माण करणारे पं. भीमसेन जोशी यांचे योगदान भारतीय संगीतात, गायन क्षेत्रात फारच महत्त्वाचे आहे. शुद्ध कलमात, दरबारी, मिया मल्हार, तोडी, नायकी, गौडसारंग, अभोगी, पुरिया, मालकंस , मासबिहाग त्यांच्याकडूनच ऐकवेत. कुठलाही राग ते ताज्या दमाने आणि दिमाखाने गातात. ठुमरी– तराणा सुद्धा त्या त्या गीत गुणधर्माप्रमाणे गातात. '' पिया के मीलन की आस' ही दर्दभरी ठुमरी फार गाजली. अभंग – भजनात तर ते स्वतःबरोबर तमाम रसिकांना भक्तिसागरात डुंबवितात. अभंगवाणी – संतवाणी ही त्यांची एक अमर भक्ती रसप्रधान अविष्कृती होय. ''हे भैरवीतले पद म्हणजे त्यांच्या बैठकीतला कळसच !

अशा जुन्या नव्या बैठकी, कितीतरी आठवणी तरीही तृप्ती नाहीच असे त्यांचे सदाबहार गायन, आधुनिक तानसेन, स्वरांचा जादुगार, किराणा घराण्याचा राजा, मैफिलीचा बादशहा पं. भीमसेन जोशी !

### उस्ताद झाकीर हुसेन यांचे कलाक्षेत्रातील योगदान

उस्ताद झाकीर हुसेन यांचा जन्म १ मार्च, १९५१ साली झाला. तबल्याचे संपूर्ण शिक्षण पंजाब घराण्याचे ज्येष्ठ तबलावादक उस्ताद अल्लारखाँ यांच्याकडे झाले, लहानपणापासून पंडित रविशंकर, उस्ताद अलि अकबर खाँ, उस्ताद विलायत खाँ यांच्यासारख्या महान कलावंतांकडून मार्गदर्शन व साथसंगतीची संधी

मिळाली. आजच्या उच्च श्रेणीतील कलावंतापैकी क्वचितक कोणी असेल की, ज्याची संगत झाकीरजींनी केलेली नाही. देश –विदेशात त्यांच्या स्वतंत्र तबला वादनाच्या तसेच त्यांनी निर्देशीत केलेल्या 'ताल वाद्य कचेरी' या कार्यक्रमांना रसिकांची अलोट गर्दी होत असते. '' इस्ट नीडस वेस्ट'' अशा प्रकारच्या भारतीय व पाश्चिमात्य वाद्यवृदांचे कार्यक्रमही ते करीत असत. चित्रपटांमधून कामे करणे, त्यांना संगीत देणे अशा प्रकारचे छंदसुद्धा त्यांनी जोपासले आहेत. सर्व घराण्यांचा खानदानी तबला अत्यंत तयारीने व आकर्षक पद्धतीने श्रोत्यांपुढे मांडण्याची कला त्यांनी साध्य करुन घेतली आहे. 'पद्मश्री' शिवाय देश–विदेशातील अनेक मान–सन्मान त्यांना मिळालेले आहेत.

**शैक्षणिक उपयुक्तता**

शालेय स्तरावर मुलांना संगीत विषयास दुय्यम स्थान प्राप्त झाले आहे. संगीत विषयाच्या गुणवत्ता वाढीसाठी उपयुक्त आहे. इतर विषयातही तेवढीच रुची निर्माण होण्याचे संगीत हे फार मोठे माध्यम आहे. बालकांच्या भावना या प्रौढ व्यक्तींपेक्षा प्रबख असतात. त्यामुळे शाळेत मुलांना गीत, नृत्य, बडबडगीते इत्यादी रेडीओ व कॅसेटद्वारे शिकविणे क्रमप्राप्त ठरते.

माणसाचे मन चंचल असते. या चंचल मनाला एकाग्र करण्याचे सामर्थ्य संगीतात आहे. म्हणून साधू, संत, ईश्वरभक्तीत लीन होतात. माणूस स्वतःचे मनोरंजन वेगळ्याच पद्धतीने करतो. डोंबारी तालावरच कसरतीचे खेळ करतो, सर्कसमध्ये वाद्य संगीतच्या नादात माणसे व पशु कसरती करतात. सैन्याची आगेकूच स्वराच्या साथीमुळे सहज होते. माणसाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत संगीताचा उपयोग होत आला आहे. म्हणून संगती हे दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक मानले गेले आहे.

**समारोप**

संगीताच्या माध्यमाने मुलांना शालेय शिक्षण दिल्यास उच्च संस्कार, शिस्त या गोष्टी मुलांमध्ये सहजपणे रुजण्यास मदत होते. संगीत विषयामुळे मनाचे केंद्रीकरण होऊ शकते. गीते पाठ करुन गाण्यामुळे मुलांच्या स्मरणशक्तीची वाढ होते. विविध संगीत क्रियांमुळे कल्पनाशक्ती जागृत होते व विविध गायन, वादन व नृत्य शैलीमुळे मुलांच्या विचारक्रिया विकसित होतात. मुलांमध्ये हवे ते संस्कार टाकून चांगले चारित्र्यसंपन्न नागरिक घडवू शकतो. एवढे प्रचंड सामर्थ्य केवळ संगीतातच आहे.

**संदर्भसूची –**

*प्रा. सतिश पाटील, अध्यापन शिक्षण पदविका अभ्यासक्रम – संगीत*
*शैलजा भंगाळे – शिक्षणातील कला व नाट्य*
*प्रा. पाटील – संगीत शिक्षण*